21 AUG 2026
पुढारी

# कुलगुरू डॉ. कामत यांना आज पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांना पिंपरी-पुणे येथील लोकशिक्षक 'बाबा भारती प्रतिष्ठान'तर्फे प्रदान करण्यात येणारा 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते शुक्रवाररी सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन येथे प्रदान होणार आहे.

याप्रसंगी 'लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार' निपाणी येथील ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर व ईश्वरपूर येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजय थोरात यांना प्रदान करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे व जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

21 AUG 2026

आउटलुक ?

# कुलगुरू डॉ. कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार जाहीर

कोल्हापूर : पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा ''लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार'' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना जाहीर झाला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती व संयोजक डॉ. पांडुरंग भोसले यांनी आज ही घोषणा केली.

ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा शुक्रवारी (ता. २१) सकाळी ११ वाजता येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात होणार आहे.

त्याचप्रमाणे प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार निपाणी येथील ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ईश्वरपूर येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजय थोरात यांना याच समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या स्मरणार्थ सदर पुरस्कार देण्यात येतात.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे आणि डॉ. आलोक जत्राटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. पुरुषोत्तम सदाफुले, आनंदा कांबळे, विजय कांबळे, रविंद्र भारती, निमिषा भारती, शार्दुल भारती आदी संयोजन करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 1 AUG 2026

# शिवाजी विद्यापीठात एसबीआय ई-पे सेवेला प्रारंभ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारांना अधिक गतिमान, सुरक्षित, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने एसबीआय ई-पे एफएएस एकात्मिक व्हाउचर पेमेंट प्रणालीचे आज कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

स्टेट बँक ऑफ इंडिया आणि कॉम्पसर्व्ह कन्सल्टंट्स यांच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या या ऑनलाइन पेमेंट प्रणालीमुळे विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारांमध्ये धनादेशाधारित पारंपरिक पद्धतीऐवजी थेट डिजिटल देयक प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. सध्या ही प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली असून, तिचे यश आणि तांत्रिक बाजू तपासून लवकरच ती टप्प्याटप्प्याने लागू केली जाणार आहे.

कुलगुरू डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या आर्थिक व्यवस्थापनात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. त्यानुसार आर्थिक व्यवहार अधिक वेगवान, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी आधुनिक डिजिटल प्रणालींचा स्वीकार आवश्यक असून, एसबीआय ई-पेच्या माध्यमातून विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारांना अधिक कार्यक्षम दिशा मिळेल.

21 AUG 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिन

कोल्हापूर : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त शांती व अहिंसेची शपथ घेऊन शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. कबीर खराडे यांनी उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, अनुष्का कदम आदींसह शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

21 AUG 2026
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिन

कोल्हापूर : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त शांती व अहिंसेची शपथ घेऊन शिवाजी विद्यापीठात गुरुवारी सद्भावना दिन साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. कबीर खराडे यांनी उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, विधी अधिकारी अनुष्का कदम आदी उपस्थित होते.

21 AUG 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ॲनिमेशन, व्हीएफएक्स क्षेत्रात मोठी संधी

■ अर्जुन माधवन यांचे प्रतिपादन

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** देशातील स्थानिक, अस्सल व समृद्ध कथा जागतिक दर्जाच्या ॲनिमेशन व व्हीएफएक्सच्या माध्यमातून जगभर पोहोचविण्याची मोठी संधी आजच्या पिढीसमोर आहे असे प्रतिपादन असेंब्लेज एंटरटेनमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन माधवन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'फ्रॉम क्लासरुम टू ग्लोबल स्क्रीन: करिअर्स इन अ चेंजिंग क्रिएटिव्ह इंडस्ट्री' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. 'नागरी जाणीवा' या विषयावरील व्यंगचित्र स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.



कोल्हापूर : 'नागरी जाणिवा' विषयावरील व्यंगचित्र स्पर्धेतील पारितोषिक विजेत्यांसोबत मान्यवर.

माधवन म्हणाले, आज कलाकार, क्रिएटर्स, कथाकार, व्हिज्युअलायझर्स, डिझायनर्स, तंत्रज्ञ व तंत्रज्ञानाच्या व्यक्तींचे क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये महत्त्व आहे. ॲनिमेशन व व्हीएफएक्समध्ये कला आणि विज्ञान यांचा अनोखा संगम असुन पात्रांची रचना, शरीराची ठेवण, हाडांची संरचना, टेक्स्चर, त्वचा, केस, कपडे आदींचे वास्तवदर्शी सादरीकरण करण्यासाठी शरीरशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, पदार्थविज्ञान व रसायनशास्त्राचे ज्ञानही उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

### व्यंगचित्र स्पर्धेतील विजेते असे

**'नागरी जाणीवा' विषयावरील व्यंगचित्र स्पर्धेत उत्कृष्ट १० व्यंगचित्रांना गौरविण्यात आले. यामध्ये अपूर्वा रमेश गिरी, धोंडी नारायण ढवळे, दिग्विजय दुधाणे, गुरूनाथ साताप्पा म्हातुगडे, मृण्मयी सदाशिव पांचाळ, निखिल विजय जाधव, समर्थ औदुंबर शिरोडकर, सोनल विनायक खडकीकर, उन्नती अनिल पाटील आणि वैष्णवी सदाशिव मदने या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.**

डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. मनीष आपटे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. सरिता ठकार, डॉ. शिवाजी जाधव, अनुप ज़त्राटकर, बबन माने, विजय उपाध्ये, राजेश कांबळे, विवेक प्रभू केळुस्कर आदी उपस्थित होते.

कलाकारांकडे समाजाला सकारात्मकतेकडें नेण्याची ताकद असते. व्यंगचित्र, मिमिक्री, लेखन, नाट्य, पटकथा, शॉर्ट फिल्म, व्हॉइस ओव्हर अशा कलात्मकतेतून सामाजिक प्रश्न मांडता येतात. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांकडे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून पाहावे, असे आवाहन सिद्धार्थ शिंदे यांनी केले.

21 AUG 2026

सकाळ



कोल्हापूर : 'नागरी जाणिवा' विषयावरील व्यंगचित्र स्पर्धेतील पारितोषिक विजेते विद्यार्थी-विद्यार्थिनींसमवेत डॉ. व्ही. एन. शिंदे, अर्जुन माधवन, सिद्धार्थ शिंदे, विनोद ठाकूरदेसाई आदी.

# कोल्हापूरच्या कथांमध्ये जागतिक क्षमता : माधवन

कोल्हापूर, ता. २० : कोल्हापूर आणि महाराष्ट्राच्या इतिहास-संस्कृतीत जागतिक स्तरावर पोहोचू शकतील, अशा असंख्य कथा दडलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, पोवाडे आणि लोकपरंपरांमधील असंख्य कथा ॲनिमेशन व व्हीएफएक्सच्या माध्यमातून जगासमोर आणता येऊ शकतात, असे प्रतिपादन असेंब्लेज एंटरटेनमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन माधवन यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठात संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू सभागृहात 'फ्रॉम क्लासरूम टू ग्लोबल स्क्रीन : करिअर्स इन अ चेंजिंग क्रिएटिव्ह इंडस्ट्री' या विषयावर झालेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तर व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी स्वागत केले. डॉ. सरिता ठकार, शिवाजी जाधव, अनुप जत्राटकर, बबन माने, विजय उपाध्ये, राजेश कांबळे, विवेक प्रभू केळुस्कर उपस्थित होते. मनीष आपटे यांनी आभार मानले.

**व्यंगचित्र स्पर्धेचे पारितोषिक वितरण**

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने 'नागरी जाणिवा' या विषयावरील व्यंगचित्र स्पर्धा घेतली. त्यातील विजेते अपूर्वा गिरी, धोंडी ढवळे, दिग्विजय दुधाणे, गुरुनाथ म्हातुगडे, मृण्मयी पांचाळ, निखिल जाधव, समर्थ शिरोडकर, सोनल खडकीकर, उन्नती पाटील, वैष्णवी मदने यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके दिली.

2 1 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# स्थानिक कथांना जागतिक व्यासपीठ देण्याची

## ॲनिमेशन, व्हीएफएक्स क्षेत्रात मोठी संधी: अर्जुन माधवन




कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज):

भारतातील स्थानिक, अस्सल आणि समृद्ध कथा जागतिक दर्जाच्या ॲनिमेशन व व्हीएफएक्सच्या माध्यमातून जगभर पोहोचविण्याची मोठी संधी आजच्या पिढीसमोर आहे. 'ग्लोबल' होण्यासाठी स्थानिकत्व सोडण्याची नव्हे, तर आपल्या मातीतल्या कथा अधिक प्रामाणिकपणे आणि जागतिक दर्जाने मांडण्याची गरज आहे. 'जितके अधिक स्थानिक, तितके अधिक अस्सल आणि तितकेच अधिक जागतिक', असे प्रतिपादन असेंब्लेज एंटरटेनमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन माधवन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आज 'फ्रॉम क्लासरुम टू ग्लोबल स्क्रीन: करिअर्स इन अ चेंजिंग क्रिएटिव्ह इंडस्ट्री' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमात 'नागरी जाणिवा' या विषयावर घेण्यात आलेल्या व्यंगचित्र स्पर्धेचे पारितोषिक वितरणही करण्यात आले.

यावेळी अर्जुन माधवन यांनी ॲनिमेशन, व्हीएफएक्स आणि क्रिएटिव्ह इंडस्ट्रीतील वाढत्या संधींचा वेध घेतला. ते म्हणाले, आज कलाकार, क्रिएटर्स, कथाकार, व्हिज्युअलायझर्स, डिझायनर्स, तंत्रज्ञ आणि तंत्रज्ञान जाणणाऱ्या व्यक्ती क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या क्षेत्रात केवळ कलात्मक कौशल्य पुरेसे नसून गणित, नियोजन, व्यवस्थापन, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संबंध आणि उत्पादन व्यवस्थापन यांसारख्या विविध कौशल्यांचीही मोठी आवश्यकता आहे.

ॲनिमेशन व व्हीएफएक्समध्ये कला आणि विज्ञान यांचा अनोखा संगम असल्याचे सांगून ते म्हणाले की, पात्रांची रचना, शरीराची ठेवण, हाडांची संरचना, टेक्स्चर, त्वचा, केस, कपडे आदींचे वास्तवदर्शी सादरीकरण करण्यासाठी शरीरशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्राचे ज्ञानही उपयुक्त ठरते. त्यामुळे या क्षेत्रात 'लेफ्ट ब्रेन' आणि 'राइट ब्रेन' या दोन्ही क्षमतांचा प्रभावी वापर होतो.

भारतात तयार होणाऱ्या दर्जेदार कामाचा उल्लेख करताना माधवन यांनी जागतिक चित्रपट व मनोरंजन क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये भारतीय स्टुडिओ आणि कलाकारांच्या योगदानाकडे लक्ष वेधले. भारत पूर्वी जगाचे 'बॅक ऑफिस' म्हणून ओळखला जात होता; मात्र कौशल्य, अनुभव आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर भारत आता जागतिक क्रिएटिव्ह इंडस्ट्रीचा 'बॅकबोन' बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### कोल्हापूरच्या कथांमध्ये जागतिक क्षमता

कोल्हापूर आणि महाराष्ट्राच्या इतिहास-संस्कृतीत जागतिक स्तरावर पोहोचू शकतील, अशा असंख्य कथा दडलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, पोवाडे आणि लोकपरंपरांमधील असंख्य कथा ॲनिमेशन व व्हीएफएक्सच्या माध्यमातून जगासमोर आणता येऊ शकतात, असे माधवन यांनी सांगितले. स्थानिक कथा अधिक अस्सलपणे मांडल्या गेल्या, तर त्यांचे वैश्विक आकर्षण वाढते, असे त्यांनी अधोरेखित केले.

### 'पहिले करिअर अंतिम नव्हे'

आपल्या स्वतःच्या कारकिर्दीचे उदाहरण देताना माधवन यांनी सांगितले की, गणित व अर्थशास्त्राचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी लंडनमध्ये गुंतवणूक बँकिंग आणि प्रायव्हेट इक्विटी क्षेत्रात काम केले. ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स क्षेत्रात येईन, असे त्या काळी स्वतःलाही वाटले नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या पहिल्या करिअरलाच अंतिम गंतव्य मानू नये. पदवी आपले अंतिम भवितव्य ठरवत नाही, असा संदेश त्यांनी दिला. विद्यार्थ्यांनी आपली इच्छाशक्ती, दृष्टिकोन आणि कौशल्य विकसित करण्यावर भर द्यावा. आजच्या इंटरनेटच्या युगात संधींची कमतरता नाही. 'स्किल सेट' पेक्षा 'विल सेट' अधिक महत्त्वाचा असून योग्य दृष्टिकोन, शिस्त आणि सातत्याच्या बळावर विद्यार्थी मोठी झेप घेऊ शकतात, असेही त्यांनी सांगितले.

### कलात्मक अभिव्यक्तीत समाजपरिवर्तनाची मोठी ताकद: सिद्धार्थ शिंदे

यावेळी 'नागरी जाणिवा' या विषयावर सिद्धार्थ शिंदे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, कलाकारांकडे समाजाला सकारात्मक आणि विधायक दिशेने नेण्याची अनोखी ताकद असते. व्यंगचित्र, मिमिक्री, लेखन, नाट्य, पटकथा, शॉर्ट फिल्म, व्हॉइस ओव्हर अशा कलात्मक माध्यमांतून सामाजिक प्रश्न प्रभावीपणे मांडता येतात आणि लोकांना विचार करण्यास प्रवृत्त करता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांकडे केवळ छंद म्हणून न पाहता समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून पाहावे, असे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, व्यंगचित्र हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजातील प्रश्न, विसंगती आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे अधोरेखित करणारे अत्यंत सामर्थ्यवान माध्यम आहे. एखाद्या व्यंगचित्रातून हजारो शब्दांत व्यक्त न होणारा आशय थेट प्रेक्षकाच्या अंतर्मनापर्यंत पोहोचतो. कलात्मक अभिव्यक्तीच्या माध्यमातून जाणिवा अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचू शकतात, असे त्यांनी सांगितले.

### 'नागरी जाणिवा' विषयावरील व्यंगचित्र स्पर्धेचे पारितोषिक वितरण

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'नागरी जाणिवा' या विषयावरील व्यंगचित्र स्पर्धा घेतली. तिचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उत्कृष्ट १० व्यंगचित्रांना गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी ड्रग्स व डोपिंग, विद्यार्थ्यांची उपस्थिती, नागरिक म्हणून सामाजिक जबाबदारी आणि परिसरातील समस्या या विषयांवर व्यंगचित्रे काढली. यामध्ये अपूर्वा रमेश गिरी, धोंडी नारायण ढवळे, दिग्विजय दुधाणे, गुरूनाथ साताप्पा म्हातुगडे, मृण्मयी सदाशिव पांचाळ, निखिल विजय जाधव, समर्थ औदुंबर शिरोडकर, सोनल विनायक खडकीकर, उन्नती अनिल पाटील आणि वैष्णवी सदाशिव मदने या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमात डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मनीष आपटे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. सरिता ठकार, डॉ. शिवाजी जाधव, अनुप जत्राटकर, बबन माने, विजय उपाध्ये, राजेश कांबळे, विवेक प्रभू केळुस्कर यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

2 1 AUG 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मानव विज्ञान विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख

# यशाची गुरूकिल्ली शिक्षणातून मिळते

त.भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** एआयच्या युगात यशस्वी व्हायचे असेल तर त्यासाठी कौशल्याधारित शिक्षणांची आवश्यकता असुन याची गुरुकिल्ली शिक्षणातून मिळते, असे प्रतिपादन मानव विज्ञान विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते. यामध्ये बी.ए, बी. कॉम, एम.ए.,एम.कॉम., एम.एस्सी (गणित), एम.बी.ए. व ऑनलाइन एम.कॉम., एम.एस्सी (गणित), एम.बी.ए. आदी अभ्यासक्रमातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग घेतला. 'पदवी व पदव्युत्तर नंतरचे करियर" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर होत्या.

डॉ. देशमुख म्हणाले, माजी विद्यार्थी मेळावा हा जुन्या आठवणींना उजाळा देणारा आनंददायी उपक्रम आहे. शिक्षण, प्रगती व अनुभव यांची देवाण घेवाण यासारख्या मेळाव्यातून होते. आपली संस्था, समाजाची प्रगती होत असते. संस्थेतून संस्कृती, मूल्य जतन आणि जडणघडण होत असते. माजी विद्यार्थी मेळावा हा संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे.

संचालक डॉ.पाटणकर म्हणाल्या, शिक्षणाला वयाची अट नाही. नोकरी,व्यवसाय सांभाळून शिक्षण घेता येते. यासाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र कटीबद्ध आहे. या केंद्राचे पदवी, पदवीव्युत्तर व ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम समाजातील विविध घटकांपर्यंत पोहचविले पाहिजेत.

डॉ. सचिन भोसले यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली. समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी स्वागत केले. डॉ. प्रकाश बेळी कट्टी यांनी पाहुण्याची ओळख करून दिली. सूत्रसंचालन डॉ. सचिन देठे यांनी केले. आभार सुप्रिया मोगले यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
2 1 AUG 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारितेमुळे अनोळखी जग पाहिले


## ज्येष्ठ छायाचित्रकार सुधारक ओलवे यांचे प्रतिपादन : विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**त. भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** पत्रकारितेमुळे अनोळखी जग पाहायला मिळाले, असे प्रतिपादन 'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त छायाचित्रकार सुधारक ओलवे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्यावतीने आयोजित जागतिक छायाचित्र दिनानिमित्त व्याख्यानात ते बोलत होते. 'साहित्य आणि ललित कला' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते. डॉ. नंदकुमार मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ओलवे म्हणाले, भौतिक जगाच्या पलीकडचे आणखी एक



**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ छायाचित्रकार सुधारक ओलवे.**

जग आपल्या आवतीभोवती वावरत असते. त्याकडे डोळेझाकपणा करणे म्हणजे आपणच आपल्याशी प्रतारणा करण्यासारखे असते. त्या जगाकडे

- **साहित्य आणि ललित कला विषयावर केले मार्गदर्शन**

डोळसपणे पाहण्याच्या आंतरिक गरजेतून मी छायाचित्रणाकडे वळलो. ओलवे यांनी निवडक छायाचित्रांमागील पार्श्वभूमी सांगून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे समाधान केले.

यावेळी सुभाष पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले. यावेळी डॉ. धनंजय देवळालकर, सोनाली जाधव, अवधूत गंगाधर आदी उपस्थित होते.

2 1 AUG 2026
पुढारी

# पत्रकारितेमुळे अनोळखी जग पाहायला मिळाले : ओलवे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पत्रकारितेमुळे यापूर्वी कधीही न पाहिलेले अनोळखी जग अनुभवता आले, असे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कारप्राप्त छायाचित्रकार सुधाकर ओलवे यांनी केले.

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त मराठी विभागात आयोजित 'साहित्य आणि ललित कला' विषयावरील कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते.

ओलवे म्हणाले, भौतिक जगाच्यापलीकडे आपल्या अवतीभोवती आणखी एक जग वावरत असते. त्याकडे डोळसपणे पाहणे आवश्यक आहे. याच आंतरिक गरजेतून आपण छायाचित्रणाकडे वळलो. माणूस हा छायाचित्रणाचा केंद्रबिंदू असून, त्याच्या डोळ्यांत पाहिल्यानंतर कोणत्याही परवानगीची गरज भासत नाही.

डॉ. शिंदे यांनी ओलवे यांच्या छायाचित्रणाची पद्धत अनवट असल्याचे सांगत त्यांच्या छायाचित्रांतून श्रमकरी, असहाय्य आणि उपेक्षित जगाचे दर्शन घडते, असे नमूद केले. ओलवे यांनी निवडक छायाचित्रांमागील अनुभव सांगून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. धनंजय देवळालकर, सोनाली जाधव, अवधूत गंगाधर आदी उपस्थित होते. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 AUG 2026
सिंधुदुर्ग समाचार

# अभ्यासाचे नियोजन, सातत्य आणि वेळेचे व्यवस्थापन स्पर्धा परीक्षांसाठी महत्त्वाचे : जयश्री गायकवाड



**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
अभ्यासाचे योग्य नियोजन, सातत्य, संदर्भ साहित्याचे सखोल आकलन, वेळेचे व्यवस्थापन आणि मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा नियमित सराव हे स्पर्धा परीक्षेतील यशाचे महत्त्वाचे घटक आहेत, असे प्रतिपादन कोल्हापूर परिक्षेत्राच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने "स्पर्धा परीक्षाः यशाची गुरूकिल्ली, करिअरच्या सुवर्णसंधी आणि प्रभावी तयारी" या विषयावर श्रीमती गायकवाड यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

आपल्या मार्गदर्शनात श्रीमती गायकवाड यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना आवश्यक असलेल्या विविध बाबींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, एकाच विषयासाठी अनेक पुस्तके वाचून द्विधा मनःस्थिती करून घेण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी एकच चांगले पुस्तक निवडून त्याचा सखोल आणि सर्वंकष अभ्यास करणे अधिक उपयुक्त ठरेल. पुस्तके बदलत राहण्यापेक्षा मूलभूत संकल्पना स्पष्ट समजून घेणे आणि त्या आत्मसात करणे यावर अभ्यासाचा भर असला पाहिजे. पुस्तकाचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका सोडविणे, त्यांचे विश्लेषण करणे आणि त्यानुसार अभ्यासाची दिशा निश्चित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थिनींना व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनात समतोल कसा साधावा, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रारंभी केंद्राच्या समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी स्वागत व परिचय करून दिला. कार्यक्रमास डॉ. सचिन भोसले, डॉ. मयुरेश पाटील यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थिनी वसतिगृहात सायबर साक्षरतेविषयी मार्गदर्शन**

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांचे 'महिला सुरक्षा व सायबर साक्षरता' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सहकार्याने झालेल्या या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. यावेळी वसतिगृह अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर, दूरशिक्षण केंद्र संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर, डॉ. कविता वड्राळे, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नगिना माळी यांच्यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 AUG 2026

आरइंट रुंद

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशास १० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६२७ साठीच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस दि. १० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.पी.एस. पाटणकर यांनी दिली.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रा अंतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम. कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांसह एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या ऑनलाईन अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत.

विविध कारणांमुळे नियमित शिक्षण घेता न आलेले विद्यार्थी, शिक्षण अर्धवट राहिलेले विद्यार्थी, नोकरी करणारे कर्मचारी, गृहिणी, उद्योजक, शेतकरी, सैनिक, कामगार तसेच बारावी उत्तीर्ण विद्यार्थी यांच्यासाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अभ्यासक्रम एक उत्तम संधी उपलब्ध करून देतात. केंद्राच्या ८९ अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रवेशासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध आहे. तसेच विद्यार्थी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर जाऊन आपला प्रवेश निश्चित करू शकतात. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयाशी किंवा जवळच्या महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाही दुहेरी पदवी घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन प्रा.डॉ. पाटणकर यांनी केले आहे.